महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/980 /२०२४ दि. 22/०८/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, भिवंडी शहरात दि. २७/०८/२०२४ रोजी **'गोपाळकाला'** सण साजरा होणार आहे. सणानिमित्त भिवंडी शहरात मुख्य रस्त्यावर कॉटरगेट जकात नाका, स्व. आनंद दिघे चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक, बी. एन. एन. कॉलेज, धामणकर नाका या ठिकाणी मुख्य दहिहंडी बांधली जाणार आहे. या दहिहंडी करीता मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य उपस्थित राहणार आहेत. तसेच नमूद दहिहंडी पाहण्यासाठी भिवंडी शहरातील तसेच आजूबाजूचे खेडेगावातील लोक मोठया संख्येने येत असतात. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, मध्यम व हलक्या वाहनांना (कार, रिक्षा, दुचाकी) तसेच एस.टी., के.डी.एम.टी, टी.एम.टी बसेस यांना **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर जड, मध्यम व हलकी वाहने रांजनोली नाका येथून वळसा घेवून मुंबई–नाशिक बायपास हायवे वरील माणकोली नाका येथून अंजूर फाटा किंवा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथून डावे वळण घेवून ओवळी गांव, ताडाळी जकात नाका, पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.

ब) एस.टी., के.डी.एम.टी, टी.एम.टी. बसेस रांजनोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरून इच्छीत स्थळी जातील. तसेच इतर वाहने रांजनोली नाका येथून वळसा घेवून परत जातील.

**प्रवेश बंद –** २) वाडा रोड मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना **अंबाडी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर जड, अवजड वाहने अंबाडी नाका येथून रा.म.क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पारोळ फाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने पारोळ फाटा येथून उजवे वळण घेवून खोणीगाव, तळवली फाटा, कांबा रोड मार्गे वसई रोड येथुन डावे वळण घेवून कारीवली मार्गे अथवा विश्वभारती फाटा येथून डावे वळण घेवून गोरसई गाव मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (एस.टी. बसेससह) **धामणगांव, जांबोळी, पाईपलाईन नाका व चाविंद्रा जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडा कडे व पुढे इच्छीत स्थळी जातील.

(ब) तसेच एस.टी. बसेस चाविंद्रा जकात नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) मुंबई–ठाणे कडून जुना ठाणे–आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अंजुर फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर सर्व प्रकारची वाहने वसई रोडने कारवली जकात नाका व वीटभट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) टी.एम.टी./एस.टी. बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो.स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टी.एम.टी./एस.टी.बसेस नारपोली पो.स्टे. येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरून इच्छीत स्थळी जातील. तसेच हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

CamScanner

**प्रवेश बंद –** ७) खाडीपार कडून भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अजयनगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने अजयनगर, गांजेगी हॉल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग –** दि. २७/०८/२०२४ रोजी सायंकाळी १६:०० ते २२:०० वाजेपावेतो कल्याण नाका – बागेफिरदोस – छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतेही वाहन उभे करण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना **दि. २७/०८/२०२४ रोजी सायंकाळी १६:०० ते २२:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण/पालघर.

**प्रत :–** पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. भिवंडी–निजामपूर शहराच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner